सीएनआर नं.:एमएचएमएम१७०१०४८९२०१८

| | | |
|---|---|---|
| **खटला नोंदणी दिनांक** | : | **०१.०८.२०१८** |
| **निकाल दिल्याचा दिनांक** | : | **११.०८.२०२६** |
| **कालावधी** | : | **०८ ०० १०**<br>**वर्ष महिने दिवस** |
| **निशाणी क्रमांक** | : | **७** |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे १७वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.**

**(पिठासीन अधिकारी ए. ए. के. शेख)**

**(न्यायनिर्णय फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५५ प्रमाणे)**

| | | |
|---|---|---|
| **१. खटल्याचा अनुक्रमांक** | : | **२३५६/पीडब्ल्यू/२०१८** |
| **२. अपराध घडल्याचा दिनांक** | : | ३०.१२.२०१७ |
| **३. फिर्यादीचे नाव** | : | महाराष्ट्र राज्य,<br>द्वारा— कांदिवली पोलिस ठाणे<br>(वर्दीदार—धवल रमेश नथवानी याचे वर्दीवरुन)<br>गुन्हा क्रमांक ६३०/२०१७ |
| **४. आरोपींचे नाव, पालकत्व व रहाण्याचे ठिकाण** | : | १. हेमंत रमेश आर्या उर्फ हेमु<br>वय : ४० वर्षे<br>रहाणार : रुम नं. ५, त्रिमुर्ती चाळ नं. १, बंदर पाखाडी रोड, गौरव गार्डनजवळ, पाटील नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई.<br>२. प्रशांत पांडुरंग पगारे उर्फ पंगा<br>वय : ३५ वर्षे<br>रहाणार : रुम नं. २७, दिपदर्शन सोसायटी, रेणुका नगर, न्यु लिंक रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई. |

Digitally signed by ARIF ABDUL KADAR SHAIKH
Date: 2026.08.11 17:18:45 +0530

| | | |
|---|---|---|
| ५. | **तक्रारीचे किंवा अपराध सिद्ध झाल्याचे कलम** | : भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६(२) सह ३४. |
| ६. | **आरोपींचे कथन व त्यांची तपासणी** | : आरोपींनी गुन्हा नाकबूल केला. |
| ७. | **अंतिम आदेश** | : आरोपींना निर्दोष मुक्त केले. |
| ८. | **आदेशाचा दिनांक** | : **११.०८.२०२६** |

**अभियोग पक्षातर्फे** : सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. हेमंत पगारे
**आरोपींतर्फे** : विधीज्ञ श्री. मनिष कनोजिया

**न्या य नि र्ण य**
**(दिनांक ११.०८.२०२६ रोजी पारीत)**

आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६(२) सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :**

२. दिनांक ३०.१२.२०१७ रोजी रात्री ११.४५ वाजताचे सुमारास मारुती बार अॅड रेस्टॉरंटबाहेर, एम. जी. रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीचा मित्र धर्मेश व्होरा यास जातीवाचक शिवीगाळ केली. त्याचा जाब विचारल्याचा राग मनात धरुन, फिर्यादी व साक्षीदार यांना आरोपींनी संगनमताने हाताने व बांबुने मारहाण करुन दुखापत केली आणि शिवीगाळ केली. तसेच, आरोपी क्रमांक २ याने त्याच्या खिशातील चाकु फिर्यादी यांच्या दिशेने फिरवून त्याच्या पाठीस दुखापत केली व त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने कांदिवली पोलिस स्टेशनला खबर दिली.

३. या तक्रारीवरुन अपराध क्रमांक ६३०/२०१७ नोंदविण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींना अटक केली व प्रकरणाचा तपास पूर्ण करुन आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

Digitally signed by ARIF ABDUL KADAR SHAIKH Date: 2026.08.11 17:18:54 +0530

४. आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४, ५०६(२) सह ३४ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. दोषारोप पत्रातील मजकूर आरोपींना समजावून सांगितला असता, त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन प्रकरण पुढे चालवण्याची विनंती केली.

५. पक्षकारांमध्ये निशाणी ४ वरील पुरसिसनुसार तडजोड झाल्याने आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. प्रस्तुतकामी अभिलेखावरील कागदपत्रे आणि आलेला पुरावा यावरुन पुढील मुद्दे विचारार्थ निर्माण झाले. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणांसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय की, दिनांक ३०.१२.२०१७ रोजी रात्री ११.४५ वाजताचे सुमारास मारुती बार ॲंड रेस्टॉरंटबाहेर, एम. जी. रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना बांबुने मारहाण करुन दुखापत केली व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह ३४ अन्वये गुन्हा केला? | : | नाही |
| २. | अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय की वर नमूद दिनांक, वेळ आणि ठिकाण येथे फिर्यादी व साक्षीदार यांनी शांतताभंग करावा या इराद्याने आरोपींनी संगनमताने त्यांना शिवीगाळ करुन | : | नाही |

Digitally signed by ARIF ABDUL KADAR SHAIKH Date: 2026.08.11 17:19:00 +0530

| | | | |
|---|---|---|---|
| | हेतूपूर्वक अपमानित केले व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा केला? | | |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाण येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली व त्याप्रमाणे भारतीय दंड संहिता कलम ५०६ (२) सह ३४ अन्वये गुन्हा केला? | : | नाही |
| ४. | आदेश काय? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

७. आरोपींविरुद्ध असलेला आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी–धवल रमेश नाथवानी (सा.क्र.१) या एकमेव साक्षीदाराची साक्ष निशाणी ५ वर नोंदविली. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.हेमंत पगारे आणि आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. मनिष कनोजिया यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता :</u>**

८. फिर्यादी–धवल नाथवानी (सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यामध्ये असे तो न्यायालयासमोरील आरोपीला ओळखतो. त्याने असे कथन केले की तो आरोपीला वैयक्तिकपणे ओळखत नाही. त्याने कांदिवली पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध तक्रार दिली होती. त्याला घटनेची नक्की तारीख आठवत नाही असे त्याने सांगितले. घटना सन २०१८ मध्ये मारुती बार आणि रेस्टॉरंट बाहेर घडली. घटनेदिवशी तो, त्याचा मित्र धर्मेश व्होरा आणि इतर काहीजण मारुती

Digitally signed by ARIF ABDUL KADAR SHAIKH Date: 2026.08.11 17:19:05 +0530

बार आणि रेस्टॉरंट, कांदिवली (पश्चिम) येथे रात्री ९.०० वाजता दारु पिण्यासाठी बसले होते. न्यायालयासमोरील आरोपींना धर्मेश ओळखतो. धर्मेश सिगारेट ओढण्यासाठी बारच्या बाहेर गेला होता आणि आरोपीसुद्धा बारच्या बाहेर होते. तेथे आरोपी व धर्मेशचे भांडण झाले. कोणीतरी येवून त्यांना त्यांचा मित्र धर्मेश याचे भांडण सुरु असल्याबाबत सांगितले म्हणून ते तेथे गेले. घटनास्थळी गर्दी होती. तो भांडण सोडवण्यासाठी गेला असता, त्यांच्यामध्ये मारामारी झाली. तेथे गर्दी असल्याने त्याला कोणी मारले ते तो सांगु शकत नसल्याचे त्याने कथन केले.

९. अभियोग पक्षाने फिर्यादीला फितुर घोषित करुन त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी घेतली. त्यावेळी त्याने अधोरेखांकीत भाग 'अ' खरा नसल्याचे सांगितले. त्याने हे नाकारले की तो व आरोपी एकाच परिसरात रहातात. त्याने फिर्यादीबद्दल काही आठवत नसल्याचे सांगितले परंतु त्याने त्यावरील त्याची सही मान्य केली. त्याने हे मान्य केले की आरोपी व त्याच्यामध्ये तडजोड झाली आहे. त्याने हे नाकारले की आरोपींसोबत तडजोड झाल्याने त्यांना वाचवण्यासाठी तो खोटी साक्ष देत आहे.

१०. आरोपींच्या विधिज्ञांनी फिर्यादीचा उलटतपास घेतला. त्यामध्ये त्याने मान्य केले की त्याला आरोपींविरुद्ध सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही, तसेच अन्य कोणताही पुरावा द्यावयाचा नाही.

११. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने केवळ फिर्यादीला तपासले, परंतु तो अभियोग पक्षाला सहकार्य करत नाही. त्याच्या उलटतपासात हे मान्य केले की त्याची आरोपींसोबत तडजोड झाली असून, त्याला आरोपींविरुद्ध सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही. निशाणी ४ वर दोन्ही पक्षकारांनी तडजोड झाल्याची पुरसिस दाखल केली आहे. अशा परिस्थितीत, आरोपींनी संगनमताने फिर्यादी

Digitally signed by ARIF ABDUL KADAR SHAIKH Date: 2026.08.11 17:19:11 +0530

व साक्षीदार यांना बांबुने मारहाण करुन शिविगाळ केली आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिली या बाबी, सबळ पुराव्याअभावी, अभियोग पक्षाने सिद्ध केलेल्या नाहीत. म्हणून मुद्दे क्रमांक १ ते ३ ला नकारार्थी निर्णय नोंदवण्यात आले आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करिता :**

१२. मुद्दे क्रमांक १ ते ३ वरील नकारार्थी निर्णयावरुन आरोपींवर लावण्यात आलेल्या आरोपातून ते निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्रमांक १ हेमंत रमेश आर्या उर्फ हेमु आणि क्रमांक २ प्रशांत पांडुरंग पगारे उर्फ पंगा यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये, भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४, ५०६ (२) सह ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीनकदबे व जातमुचलके रद्द करण्यात येत आहेत. रोख जामीनाची रक्कम, असल्यास, त्यांना तात्काळ परत करणेत यावी.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) नुसार प्रत्येकी रुपये १०,०००/— चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायपिठासनावरुन लिखित व घोषित करण्यात आला.)

Digitally signed by ARIF ABDUL KADAR SHAIKH
Date: 2026.08.11 17:19:18 +0530

(ए. ए. के. शेख)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
१७ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

स्थळ : बोरीवली
दिनांक : ११.०८.२०२६
निमोप्र.

टंकलिखित दिनांक : ११.०८.२०२६ स्वाक्षरी केलेला दिनांक : ११.०८.२०२६